# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३– १४

**क्रीडा विभाग**

पुणे जिल्हा ५ पुढारी | पुणे, शनिवार १४ डिसेंबर २०१३

# राजगुरु महाविद्यालयाचे 'नेटबॉल'मध्ये यश

राजगुरुनगर : प्रतिनिधी

आंतर महाविद्यालयीन मुलींच्या नेटबॉल स्पर्धेत राजगुरुनगरच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने अजिंक्यपद पटकावले. पुणे जिल्हा क्रीडा विभाग व टी. सी. महाविद्यालयाच्या वतीने बारामती येथे बुधवारी (दि.११) या स्पर्धा पार पडल्या.

अत्यंत चुरशीने झालेल्या अंतिम सामन्यात चाकण महाविद्यालयाच्या संघाचा हुतात्मा महाविद्यालय संघाने ४०-१० असा मोठ्या फरकाने पराभव केला. संघातील खेळाडू प्रणिता गारगोटे, अश्विनी पडवळ, संध्या काळे, तेजश्री जाधव व रुपाली रणपिसे या विद्यार्थिनींची पुणे जिल्हा क्रीडा विभागाच्या संघात निवड करण्यात आली.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्यांचे मार्गदर्शक शिक्षक प्रा. डी. जे. टाकळकर, प्रा. एस. पी. पानसरे यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव ॲड राम कांडगे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने अभिनंदन केले.

सकाळ पुणे जिल्हा
शुक्रवार, २० डिसेंबर २०१३ ४

# राजगुरू महाविद्यालयास विजेतेपद

राजगुरुनगर, ता. १९ : बारामती येथे झालेल्या जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत राजगुरू महाविद्यालयाने चाकण महाविद्यालयाचा ४०-१० असा फरकाने पराभव केला. संघातील प्रणिता गारगोटे, अश्विनी पडवळ, संध्या काळे, तेजश्री जाधव, रूपाली रणपिसे यांची जिल्हा संघामध्ये निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. डी. जे. टाकळकर व प्रा. एस. पी. पानसरे यांनी मार्गदर्शन केले.



राजगुरुनगर (ता. खेड) : बारामती येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धेमध्ये अजिंक्य ठरलेला हुतात्मा महाविद्यालयाचा संघ.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख